नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 28/12/2022 (बुधवार) सायंकाळ

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. बेला** – अंतर्गत २२ किमी अंतरावर मौजा सिर्सी येथे दिनांक २५/१२/२०२२ चे १०.३० वा. ते १८.०० वा. दरम्यान नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्याची पत्नी हे रोजमजुरीचे कामाला गेले होते सायंकाळी १८.०० वा घरी परत आले तेव्हा त्यांची अल्पवयीन मुलगी, वय १७ वर्ष ०२ महिने हि घरी हजर मिळुन आली नाही. फिर्यादीचे मुलीला कोणीतरी अज्ञात ईसमाने फुस लावुन पळवुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठेंगणे मो क्र ७९७२८१२५६९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर